(2)

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष १, अंक ६६] मंगळवार, जून २३, २०१५/आषाढ २, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

## असाधारण क्रमांक १५८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जून २०१५

**सूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक प्राफेब. २०१०/प्र.क्र.२६/पुनर्बांधणी-३/म-१०.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा.एकेचाळीस) चे कलम ४, पोट-कलम (१), खंड (तीन) व (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा पुढीलप्रमाणे मसुदा उक्त कलम ४ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ; आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, दिनांक २२ जुलै २०१५ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त मसुदा विचारात घेईल.

२. उक्त मसुद्यासंदर्भात उपरोक्त दिनांकापूर्वी विभागीय आयुक्त, नागपूर महसूल विभाग, जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ. समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१ यांच्याकडे कोणत्याही व्यक्तीकडून प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**अधिसूचनेचा मसुदा**

क्रमांक प्राफेब. २०१०/प्र.क्र.२६/ पुनर्बांधणी-३/म-१०.—ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा एकेचाळीस) चे कलम ४, पोट-कलम, (१) खंड (तीन) व (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने तालुक्यांचा समावेश असलेले उपविभाग त्यांच्या मुख्यालयासह क्रमांक प्राफेब. २०१०/प्र.क्र.२६/ पुनर्बांधणी-३/ म-१०, दिनांक २६ जुलै २०१३ च्या शासन अंतिम अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त कलम ४ च्या पोट-कलम (४) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी दिनांक २६ जून २०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन प्रारुप अधिसूचनेनुसार गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव-अर्जुनी आणि सडक-अर्जुनी या तालुक्यांच्या उपविभागाचे मुख्यालय हे सडक-अर्जुनी असून ते दिनांक २६ जुलै २०१३ च्या अंतिम अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे मोरगाव-अर्जुनी नसल्यामुळे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र.७२/२०१३ च्या अनुषंगाने दिनांक १० डिसेंबर २०१४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, दिनांक २६ जुलै २०१३ ची अंतिम अधिसूचना, त्या अधिसूचनेमधील परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेल्या नागपूर विभागातील गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव-अर्जुनी या उपविभागासंदर्भातील बाब क्र. १४१ रद्दबातल ठरविली आहे.

आणि ज्याअर्थी, गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव-अर्जुनी उपविभागामध्ये मोरगाव-अर्जुनी आणि सडक-अर्जुनी या तालुक्यांच्या उपविभागाचे मुख्यालय मोरगाव-अर्जुनी येथे होणे महाराष्ट्र शासनाला आवश्यक वाटते, त्यामुळे, आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा.एकेचाळीस) चे कलम ४, पोट-कलम (१), खंड (तीन) व (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त कलम, ४ च्या पोट-कलम (४) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वीच, दिनांक २६ जून २०१२ रोजी, प्रसिद्ध करण्यात आलेल्या उक्त शासन प्रारुप अधिसूचनेमध्ये, महाराष्ट्र शासन याद्वारे पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे:

याद्वारे, उक्त अधिसूचना, त्या अधिसूचनेच्या परिशिष्टातील क्र. १४१ मधील मजकुराऐवजी पुढीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :—

| अ. क्र. | जिल्हा | उप विभागाचे नाव | उपविभागात समाविष्ट होणाऱ्या तालुक्यांची क्षेत्रे | उप विभागाचे मुख्यालय |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| " १४१ | गोंदिया | मोरगाव-अर्जुनी | मोरगाव-अर्जुनी व सडक-अर्जुनी | मोरगाव-अर्जुनी ". |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कि. पां. वडते,
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd June 2015

**Notice**

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Pra.Phe.B.2010/C.R.26/Reconstruction-3/M-10.—The following draft of the notification, which the Government of Maharashtra proposes to issue in exercise of the powers conferred by clauses (*iii*) and (*vi*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 4 for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 22nd July, 2015.

2. Any objections or suggestions, which may be received by the Divisional Commissioner, Nagpur Revenue Division, Old Secretariat Building, in front of General Post Office, Civil Lines, Nagpur 440 001, from any person in respect to the said draft, before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No.Pra.Phe.B.2010/C.R.26/Reconstruction-3/M-10.—Whereas *vide* Government Notification, Revenue and Forests Department, No. Pra.Phe.B. 2010/C.R.26 /Reconstruction-3/M-10, dated the 26th July 2013 issued in exercise of the powers conferred by clauses (*iii*) and (*vi*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), the Sub-Divisions consisting of talukas mentioned therein are specified alongwith their headquarters ;

And whereas, the High Court of Judicature at Bombay, Nagpur Bench, *vide* its judgement dated 10th December 2014 passed in Public Interest Litigation No. 72 of 2013 quashed and set aside the said notification so far as it relates to specifying Morgaon-Arjuni as headquarter of the Morgaon-Arjuni Sub-Division in Gondia District in Nagpur Division under entry No. 141 of the Schedule appended thereto, on the ground that in the draft notification dated the 26th June 2012, previously published under sub-section (*4*) of the said section 4, the headquarter of the Morgaon-Arjuni Sub-Division was specified at Sadak-Arjuni and not at Morgaon-Arjuni as specified in the said final notification, dated the 26th July 2013 ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to specify that Morgaon-Arjuni and Sadak-Arjuni Talukas in Gondia District shall constitute Morgaon-Arjuni Sub-Division, having its headquarter at Morgaon-Arjuni.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*iii*) and (*vi*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, after the same having being previously published as required by sub-section (*4*) of said section 4, amends the said notification as follows :—

In the said Notification, in the Schedule, for entry No. 141, the following shall be substituted, namely :—

| Sr. No. (1) | District (2) | Name of Sub-Division (3) | Areas of Talukas constituting Sub-Division (4) | Headquarters of Sub-Division (5) |
|---|---|---|---|---|
| "141. | Gondia | Morgaon-Arjuni | Morgaon-Arjuni and Sadak-Arjuni | Morgaon - Arjuni". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

K. P. WADTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.